# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. ०७१२-२५६७०२८
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 3479 /शि.वि./२०१७
दि. 06/०१/२०१७

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्यमिक शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :- शालेय विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती ॲपव्दारा नोंदविण्याबाबत.**

संदर्भ :- १) दि.०५.०१.२०१७ ची विडीयो कॉन्फरन्समधील मा.शिक्षण आयुक्त यांचे निर्देश.
२) शासकीय परिपत्रक दि. ०३.११.२०१६ - विद्यार्थ्यांसोबत सेल्फी घेवून उपस्थिती दर्शविण्याबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग महाराष्ट्र शासनातर्फे उपस्थिती ॲप (UPASTHITI APP) विकसीत केले असून यामध्ये विद्यार्थ्यांची दररोजची उपस्थिती दर्शवायची आहे. सदर ॲप एनरॉईड मोबाईलमध्ये प्ले स्टोरवर उपलब्ध असून ते प्रत्येक वर्गशिक्षकाने आपल्या मोबाईलमध्ये इनस्टॉल करणे अनिवार्य आहे. सदर ॲप इनस्टॉल झाल्यावर त्यामध्ये आपल्या शाळेचा यु-डायस कोड टाकावा. तसेच दुसऱ्या ज्या वर्गशिक्षकांचे नाव सरल स्कूल मॅपींगमध्ये रजिस्टर झाले आहे, त्यांचा रजिस्टर मोबाईल क्र. टाकावा. ते ENTER केल्यावर OTP नंबर मिळेल व Confirm OTP केल्यावर Registration Succesfull असा मॅसेज येवून वर्गशिक्षकाचे नाव रजिस्टर होईल. यानंतर शालेय विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदविता येईल. यामध्ये आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांचे नावे दिसतील. त्यापैकी अनुपस्थित विद्यार्थ्यांच्या नावावर मार्कीग करून ती अटेंडस सबमिट करावयाची आहे.

महिन्यातील दररोजची उपस्थिती वरीलप्रमाणे नोंदवून फक्त सोमवारला पुनश्च १० विद्यार्थ्यांच्या ग्रूपसोबत वर्गशिक्षकाला सेल्फी घेवून ती याच ॲपमध्ये अपलोड करावयाची आहे. अपलोड करण्याकरीता अगोदर १०-१० विद्यार्थ्यांसोबत सोमवारला फोटो काढावेत व अश्याप्रकारे वर्गातील सर्व विद्यार्थ्यांसोबत काढलेले फोटो एकत्रितपणे अपलोड करावे. सुरवातीचे दोन सोमवार पूर्ण विद्यार्थ्यांसोबत सेल्फी फोटो अपलोड करायचे आहे, त्यानंतर मात्र तिसऱ्या सोमवारपासून फक्त शाळेत अनियमित राहणाऱ्या विद्यार्थ्यांसोबत सेल्फी काढून ती अपलोड करावयाची आहे.

शालेय शिक्षण व क्रिडा विभाग महाराष्ट्र शासनातर्फे यापुढील सर्व कार्य डिजीटल पध्दतीने करण्यात येणार असल्यामुळे सर्व शिक्षकांजवळ एनरॉईड/स्मार्ट फोन असणे अनिवार्य आहे. ज्या वर्ग शिक्षकांजवळ एनरॉईड/स्मार्ट फोन राहणार नाही त्यांना उपस्थिती ॲप मध्ये विद्यार्थ्यांची दररोजची हजेरी भरता येणार नाही. व यामुळे महाराष्ट्र शासनाला आवश्यक असलेली माहिती आपण सादर करू शकणार नाही.

- ❖ युडायसमध्ये भरलेली माहिती भारत सरकारच्या NUEPA च्या वेबसाईडवर भरावयाची आहे.
- ❖ ज्ञानप्रकाश या NGO मार्फत Student Learning Achivement App तयार केले असून विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेची माहिती यावरून आपणांस समजून घेता येते. हे ॲप डाऊनलोड करून यु-डायस कोड वर्ग शिक्षकाचे नाव, वर्ग व विषय इत्यादी माहिती भरावी. यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याला चाचणीमध्ये प्राप्त झालेले गुण भरावे.
- ❖ शिष्यवृत्ती परीक्षा फेब्रुवारी २०१७ करीता इयत्ता ५ वी व ८ वी च्या नोंदविलेल्या विद्यार्थ्यांची प्रपत्र अ यादीची झेरॉक्सप्रत कार्यालयात श्री.प्रशांत टेंभूर्णे यांचेकडे त्वरीत सादर करावी. यादीवर केंद्र संकेतांक व तालुका संकेतांक ठळकपणे लिहावा.
- ❖ आपल्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे आधारकार्ड क्र. सरल प्रणालीमध्ये Student Portal वर लिंक करावयाचे आहे. ज्या विद्यार्थ्यांचे आधारकार्ड तयार आहेत त्यांचे आधार क्रमांक त्वरीत अपलोड करावे.ज्या विद्यार्थ्यांचे आधारकार्ड बनविले नसेल त्याचे आधारकार्ड शाळेचे इलेट्रीक बिल व बोनाफाईड सर्टीफिकेट देवून त्वरीत तयार करावे.

(फारुक अहमद खान)
शिक्षणाधिकारी